Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 13TH FEBRUARY 1896.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

# PART IX.—Marathi Acts, &c.

## रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम जंजीरे मुंबई, तारीख ७ माहे नव्हेंबर सन १८९५.

नं०. ८६९४.—हिंदुस्थान सरकारचे खालील जाहिरनामे पुनः प्रसिद्ध केले आहेत:—

## "फिनान्स ॲण्ड कामर्स डिपार्टमेंट.

### सेपरेट रेव्हिन्यू.

### स्टांप.

मुकाम सिमला, तारीख १ माहे नव्हेंबर सन १८९५.

नंबर ५१९७-एस्. आर.—ज्याअर्थी फिनान्स ॲण्ड कामर्स डिपार्टमेंटांतील ठराव नंबर ३६३६,* तारीख १३ माहे नव्हेंबर सन १८८०, याच्या अटींअन्वयें, खालील मंडळ्यांनीं काढलेले जे डिबेंचर त्या प्रत्येकीच्यासमोर दाखविले आहेत त्यांवर पडणाऱ्या स्टांप ड्यूटीबद्दल जरूर असणाऱ्या उक्तया रकमा त्यांच्या संबंधानें सरकारी तिजोरींत भरण्यांत आल्या आहेत:

* तारीख १८ माहे नव्हेंबर सन १८८० चें मुंबई सरकारी गॅझेट, भाग १, पृष्ठ ९४५, यावर पुनः प्रसिद्ध केला आहे.

त्याअर्थीं हिंदुस्थानचा स्टांप आक्ट (सन १८७९ चा १ ला) याच्या ८ व्या कलमांत दिलेला अधिकार चालवून आली जनाब गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं, सदरहू डिबेंचरांबद्दल एरव्हीं जी कोणतीही स्टांप ड्यूटी पडती, मग ती ते काढतेवेळीं असो, नवीन करतेवेळीं असो, एकाऐवजीं अनेक करतेवेळीं असो किंवा अनेकांऐवजीं एक सबंध करतेवेळीं असो, ती त्यांस माफ केली आहे.

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| कोणीं काढिला. | डिबेंचराची तारीख. | डिबेंचराचा नंबर. | दरेक डिबेंचराची किंमत. | एकंदर रकम. |
| | | | रु. | रु. |
| अमदाबाद म्युनिसिपालिटीनें. | ऑक्टोबर १, १८९१ ... | ६९ ते १०२ | ५०० | १७,००० |

[चालू.]

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| कोणीं काढिला. | डिबेंचराची तारीख. | डिबेंचराचा नंबर. | दरेक डिबेंचराची किंमत. | एकंदर रकम. |
| | | | रु. | रु. |
| मुंबई बंदराचे ट्रस्टी यांनीं. | मार्च ३१, १८८३.... | ००१ ते १०० | १०,००० | १,००,००० |
| | | १०१ ते १०९ | ५,००० | ४५,००० |
| | | ११० ते १३८ | १,००० | २९,००० |
| | | १३९ ते ४७२ | ५०० | १,६७,००० |
| | एप्रिल २, १८८३ ... | ४७३ ते ५१२ | ५०० | २०,००० |
| | | ५१३ ते ५१६ | ५,००० | २०,००० |
| | नव्हेंबर २०, १८८३ ... | ५१७ | १,५४,८७६-२-९ | १,५४,८७६-२-९ |
| मुंबई शहरच्या म्युनिसिपालिटीनें. | डिसेंबर २३, १८९२ ... | १ ते ५०० | ५०० | २,५०,००० |
| | नव्हेंबर ३०, १८९३ ... | ५०१ ते ८५० | | १,७५,००० |
| | डिसेंबर १, १८९३ ... | ८५१ ते ९०० | | २५,००० |
| | जून २८, १८९३ ... | १ ते ८४०० | | ४२,००,००० |
| | जानेवारी १२, १८९४. | १४९ ते १५९७ | | ७,२४,५०० |
| | | २४५८ ते २५४१ | | ४२,००० |
| | ,, १५, ,, | ११३ ते १४८ | | १८,००० |
| | | २५४२ ते २५४४ | | १,५०० |
| | ,, १६, ,, ... | १६५८ ते २२०७ | | २,७५,००० |
| | ,, १८, ,, ... | २२०८ ते २२५७ | | २५,००० |
| | ,, २४, ,, ... | २९ ते ११२ | | ४२,००० |
| | ,, २५, ,, | १५ ते २८ | | ७,००० |
| | | २५४५ ते २६०० | | २८,००० |
| | ,, २७, ,, ... | १ ते १४ | | ७,००० |
| | ,, २९, ,, ... | १५९८ ते १६३६ | | १९,५०० |
| | ,, ३०, ,, ... | १६३७ ते १६५७ | | १०,५०० |
| | ,, ३१, ,, ... | २२५८ ते २४५७ | | १,००,००० |
| | * * | * * | | |
| पुणें क्यान्टोन्मेंट फंडानें. | एप्रिल १, १८८५ ... | ८१ ते २४० | ५०० | ८०,००० |
| | * * | * * | | |

नं० ५१९९-एस्. आर.—हिंदुस्थानचा स्टांप भाक्ट (सन १८७९ चा १ ला) याच्या ८ व्या कलमाअन्वयें या जाहिरनाम्यावरून असें जाहीर करण्यांत येतें कीं, (अ) कोणतेही दस्तऐवज, अगर (ब) कोणत्याही विशेष वर्गाचे दस्तऐवज, अगर (क) अशा वर्गाच्या दस्तऐवजांपैकीं कोणतेही दस्तऐवज, अगर (ड) कोणत्याही विशेष वर्गाच्या मनुष्यांनीं किंवा मनुष्यांस किंवा अशा वर्गांतील कोणत्याही मनुष्यांनीं किंवा मनुष्यांस कोणतेही दस्तऐवज करून दिले असतील तेव्हां ते दस्तऐवज, यांवर पडावयाच्या ड्युटी सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानांत किंवा त्याच्या कोणत्याही भागांत पुढल्या कोणत्याहि तारखेपासून किंवा मागल्या कोणत्याहि तारखेपासून कमी करण्याचा किंवा माफ करण्याचा आपला अधिकार चालवून, भाली जनाब गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांजकडून—

(१) या जाहिरनाम्याच्या पहिल्या परिशिष्टाच्या पहिल्या कोष्टकांत सांगितलेल्या दस्तऐवजांवर पडणाऱ्या ड्यूटी कमी करून त्यांच्या ऐवजीं, त्याच परिशिष्टाच्या दुसऱ्या कोष्टकांत सांगितलेल्या निरनिराळ्या रकमा ठरविल्याबद्दल फर्माविण्यांत येत आहे; आणि

(२) या जाहिरनाम्याच्या दुसऱ्या परिशिष्टांत सांगितलेल्या दस्तऐवजांवर पडणाऱ्या ड्यूटी माफ करण्यांत आल्या आहेत.

२. हिंदुस्थानचा स्टांप आक्ट (सन १८७९ चा १ ला) याच्या ८ व्या कलमाखालील पूर्वीचे सर्व जाहिरनामे या जाहिरनाम्यावरून रद्द केले आहेत, परंतु यामुळें त्यांअन्वयें ज्या ड्यूटी यापूर्वी कमी अगर माफ करण्यांत आल्या असतील त्यांस बाध येतो असें समजूं नये.

---

## पहिलें परिशिष्ट.

### ज्यांवर स्टांप-ड्यूटी कमी केली आहे ते दस्तऐवज.

| १ | २ |
|---|---|
| दस्तऐवजाचा प्रकार. | स्टांपाची योग्य ड्यूटी. |
| १. मद्रास इलाखा, कुर्ग किंवा म्हैसूर या प्रदेशांतील काफीच्या मळ्यांमध्यें नौकरी अगर काम करण्याकरितां करून दिलेली कबुलायत, जेव्हां अशा कबुलायतीअन्वयें दिलेली अगाऊ रकम वीस रुपयांहून जास्त नसेल तेव्हां. | एक आणा. |
| २. ज्या चार्टरपार्टीमध्यें, तिजवरून केलेला कोणताहि करार मोडल्याच्या प्रसंगीं नुकसानीचा मोबदला देण्याच्या संबंधानें कलम असेल अशी चार्टरपार्टी. | एक रुपया. |
| ३. एकादें पीक गहाण लावून घेऊन, मग तें पीक असें गहाण लावून घेतेवेळीं विद्यमान असो अगर नसो, अशा गहाणावर दिलेल्या कर्जाच्या फेडीसाठीं कबुलायतीच्या स्वरूपाचा केलेला दस्तऐवज. (अ) असा कर्जाऊ दिलेला पैका त्या दस्तऐवजाचे तारखेपासून तीन महिन्यांहून जास्त नसणाऱ्या मुदतींत परत देण्याचा असेल तेव्हां. | हिंदुस्थानचा स्टांप आक्ट (सन १८७९ चा १ ला), परिशिष्ट १, कलम ११ (ब) अन्वयें जी ड्यूटी, याप्रमाणें कर्जी दिलेल्या रकमेच्या बिल आफ् एक्स्चेंजवर पडावयाची, तिच्या निमें ड्यूटी. |
| (ब) असा कर्जाऊ दिलेला पैका त्या दस्तऐवजाचे तारखेपासून तीन महिन्यांनंतर परंतु एका वर्षाहून अधिक नसणाऱ्या मुदतींत परत देण्याचा असेल तेव्हां. | हिंदुस्थानचा स्टांप आक्ट (सन १८७९ चा १ ला), परिशिष्ट १, कलम ११ (ब) अन्वयें जी ड्यूटी याप्रमाणें कर्जी दिलेल्या रकमेच्या बिल आफ् एक्स्चेंजवर पडावयाची, तितकीच ड्यूटी. |
| ४. एकाद्या कंपनीच्या अगर मंडळीच्या [असोशिएशनाच्या] शेरांचें बक्षीसपत्र. | हिंदुस्थानचा स्टांप आक्ट (सन १८७९ चा १ ला), परिशिष्ट १, कलम ६० (अ) अन्वयें जितकी ड्यूटी, अशा बक्षीसपत्रांत अशा शेरांची जी किंमत लिहिली असेल तिच्याइतक्या ऐवजा- |

## पहिलें परिशिष्ट—समाप्त.

### ज्यांवर स्टांप-ड्यूटी कमी केली आहे ते दस्तऐवज—समाप्त.

| १ | २ |
|---|---|
| दस्तऐवजाचा प्रकार. | स्टांपाची योग्य ड्यूटी. |
| | ज्या मोबदला ते शेर दुसऱ्याच्या नांवें करून देण्याबाबदच्या दस्तऐवजावर पडावयाची, तितकीच ड्यूटी. |
| ५. तीस वर्षांहून जास्त नसणाऱ्या मुदतीच्या ठरावाखालीं [ सेटलमेंटखालीं ] धारण केलेल्या व सरकारास भरसारा भरणाऱ्या जमिनीचें **वांटणीपत्र.** | अशा जमिनीच्या वार्षिक महसुलाच्या पांचपट रकमेवर पडणाऱ्या ड्यूटीहून जास्त नसणें. |
| ६. फक्त एकेरी प्रवासाकरितां चालणारी रेलवेवरील अपायांबाबदची **विम्याची पालिसी,** कोणत्याही रेलवेवरून १ ल्या किंवा २ ऱ्या वर्गानें प्रवास करणाऱ्या उतारूस दिली असेल तेव्हां. | एक आणा. |
| ७. इलाख्यांतील स्मालकाज कोर्टासंबंधीं आक्ट ( सन १८८२ चा १५ ) याखालील दाव्यांत अगर त्याखालीं चालवावयाच्या कामांत लागणारा, हिंदुस्थानचा स्टांप आक्ट ( सन १८७९ चा १ला ), परिशिष्ट १, कलम ५० (ब), यांत सांगितल्या प्रकारचा **मुखत्यारनामा [ पावर-आफ्-अटर्नी ].** | आठ आणे. |
| ८. कोणत्याहि स्त्रीनें—<br>(अ) मुंबईचा लोकल बोर्ड आक्ट ( सन १८८४ चा मुंबईचा आक्ट १ ला ) याच्या ठरावांअन्वयें होणाऱ्या एकाद्या लोकल बोर्डाच्या मेंबरांच्या कोणत्याहि एका निवडीच्या प्रसंगीं, किंवा<br>(ब) मुंबईचा डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल आक्ट सुधारण्याविषयींचा आक्ट ( सन १८८४ चा मुंबईचा आक्ट २ रा ) याच्या ठरावांअन्वयें होणाऱ्या म्युनिसिपल कमिशनरांच्या कोणत्याहि एका निवडीच्या प्रसंगीं,<br>मत देण्याच्या अधिकाराचें कोणत्याहि मनुष्यास करून दिलेलें **प्राक्सी** [ अधिकारपत्र ]. | एक आणा. |
| ९. **ट्रस्ट डीड** [ ट्रस्टचें खत ]— | |
| (अ) मुंबई इलाख्यांतल्या शाळांस, इमारती बांधण्याच्या कारणांसाठीं सरकाराकडून देण्यांत येत असलेल्या ग्रांट-इन्-एडचें नियमन करण्याबाबद त्या त्या विद्यमानकाळीं त्या इलाख्यांत अमलांत असलेल्या कायद्यांस अनुसरून जें कोणतेंही ट्रस्ट डीड तारीख ९ माहे मे सन १८९५ पूर्वी केलेलें असेल तें. | १५ रुपयांहून जास्त नसणें. |
| (ब) अशा ग्रांट-इन्-एडचें नियमन करण्याबाबद वेळोवेळीं अमलांत असलेल्या कायद्यांस अनुसरून असें जें कोणतेंही डीड सदरहू तारीख ९ माहे मे सन १८९५ रोजीं किंवा त्यानंतर केलें असेल तें. | तितक्याच रकमेच्या किंवा किंमतीच्या खतावर जितकी ड्यूटी पडावयाची तितकी ड्यूटी, अथवा १५ रुपयांची रकम, या दोहोंपैकीं जी कमी असेल ती. |

## दुसरें परिशिष्ट.

### ज्यांस स्टांप-ड्यूटीची माफी आहे ते दस्तऐवज.

१. कबुलायती—

(अ) दक्षिणेंतील शेतकऱ्यांना कर्जबाजारींतून सोडविण्याविषयीं आक्ट (सन १८७९ चा १७ वा) याच्या ४३ व्या कलमांत सांगितल्या प्रकारच्या कबुलायती;

(ब) ज्यांचें स्वामित्व गेलें आहे अशीं कुळें अगर खातेदार कुळें ह्यांचे खंड वाढविण्याच्या संबंधाच्या ज्या लेखी कबुलायतींचा उल्लेख वायव्य प्रांतांतील खंडाबाबत आक्ट (१८८१ चा १२ वा), कलम १२, रकम (अ), ह्यांत केलेला आहे तशा कबुलायती;

(क) हिंदुस्थानचा देशनिर्गमनाविषयीं आक्ट (सन १८८३ चा २१), कलम ३९, पोट-कलम (१), याअन्वयें करून दिलेल्या कबुलायती;

(ड) सन १८८६ चा आक्ट २ (शेती खेरीज करून इतर मार्गांनीं झालेल्या प्राप्तीवर कर बसविण्यासाठीं आक्ट), कलम ९, पोट-कलम (२), याअन्वयें केलेल्या कबुलायती;

(ई) सर्व्हे झालेल्या अगर सर्व्हे न झालेल्या जमिनीच्या खात्याबाबत आणि तिजबद्दल जमीनमहसूल भरण्याबाबत, मुंबईचा जमीनमहसुलाचा कायदा (सन १८७९ चा मुंबईचा आक्ट ५), याअन्वयें अगर त्या आक्टाअन्वयें केलेल्या कोणत्याहि कानूअन्वयें करून दिलेल्या कबुलायती;

(फ) किंवा कमिसरेटच्या एकाद्या एक्झिक्युटिव्ह अमलदाराकडे दिलेलें टेंडर ज्या इकरारांच्या द्वारें करारादाखल मान्य केलें जातें ते इकरार: मक्तेदारानें आपल्या कराराच्या तारणादाखल हिंदुस्थान सरकारच्या लोनाच्या नोटी अगर रोकड रकम अनामत ठेविली असेल त्या बाबतींत;

(ग) कमिसरेटच्या मक्तेदारांनीं तारणाबद्दल ठेविलेला ऐवज एकाद्या सेव्हिंग ब्यांकेच्या स्वाधीन करण्यांत येतो त्या प्रसंगीं असे मक्तेदार करून देतात त्या कबुलायती;

(ह) रेलवे कंपन्या अगर आड्मिनिस्ट्रेशनें यांबरोबर माल नेण्याकरितां केलेल्या कबुलायती;

(आय्) रेलवे कंपन्या अगर आड्मिनिस्ट्रेशनें यांबरोबर केलेल्या ज्या कबुलायती, हिंदुस्थानचा रेलवेबाबद आक्ट (सन १८९० चा ९ वा), कलम ७२, पोट-कलम (१), ह्यांत सांगितलेल्या सदरहू कंपन्यांच्या किंवा आड्मिनिस्ट्रेशनांच्या जबाबदारीची इयत्ता करण्याच्या मतलबाच्या असून ज्या, सदर्हू कलमाचें पोट-कलम (२) याअन्वयें आली जनाब गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं पसंत केलेल्या नमुन्याप्रमाणें असतील त्या कबुलायती;

(ज) किंवा पार्सलें ज्या दरानीं नेण्यांत येतात त्यांच्या निम्या दरांनीं नेण्याचे जिन्नस, ह्मणजे ताजी मासळी, फळें, भाजीपाला, बाजारी मालाच्या टोपल्या [बझार बास्केट], पांव, मांस, बर्फ व इतर फार वेळ न टिकणारे जिन्नस, हे आपल्या स्वाधीन करण्याच्या संबंधानें (रेलवेची पावती दाखविली नसेल तेव्हां) कन्सैनींनीं [ज्यांच्या नांवें जिन्नस पाठविले असतील त्यांनीं] रेलवेच्या अधिकाऱ्यांस दिलेले इंडेम्निटी-बांड;

(के) आणि देरा डुन येथील फारेस्ट स्कुलांत प्रवेश करण्याच्या आधीं विद्यार्थ्यांनीं व त्यांच्या जामिनांनीं, प्राव्हिन्शियल फारेस्ट सर्व्हिस मधील नेमणुकांचें व बढत्यांचें नियमन करण्यासाठीं करण्यांत आलेल्या कानूअन्वयें करून द्यावयाचीं जामीनखतें.

आर्टिकल्स आफ् असोसिएशन—

खालील रकम ११ पाहा.

२. बिल आफ् एक्स्चेंज—

जीं म्हैसुरांत, बंगळूरच्या सिव्हिल व मिलिटरी स्टेशनांत, हैदराबाद असैन्ड डिस्ट्रिक्टांत, हैदराबाद रेसिडेन्सी बाजारांत अगर सिकंदराबादच्या क्यांटोन्मेन्टांत लिहिलेलीं असून ज्यांबद्दल स्टांप ड्यूटीचा भर दर तेथें दिलेला असेल तीं ब्रिटिश हिंदुस्थानांत बेचन करण्यांत येतील त्या प्रसंगीं.

३. बिल आफ् लेडिंग—

## दुसरें परिशिष्ट—चालू.

### ज्यांस स्टांप-ड्यूटीची माफी आहे ते दस्तऐवज—चालू.

ब्रिटिश हिंदुस्थानाबाहेर करून दिलेलीं असून ब्रिटिश हिंदुस्थानांत स्वाधीन करावयाच्या मालासंबंधीं असतील तीं.

४. **बांड** [ खत ]—

जामीनखतें—

(अ) अपाथिकरी क्लास, असिस्टंट सर्जन क्लास व हास्पिटल असिस्टंट क्लास ह्यांतील वैद्यकीय विद्यार्थ्यांकडून व त्यांच्या जामिनांकडून सरकारच्या अधिकाराअन्वयें घेतलेलीं.

(ब) मुंबईचा इरिगेशन आक्ट ( सन १८७९ चा मुंबईचा आक्ट ७ वा ), कलम ७०, ह्याअन्वयें आलीजाह मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल ह्यांनीं केलेल्या कानूंपैकीं कानू ३-अ अन्वयें लिहून घेतलेलीं.

वरील रकम १ (ज) व (के) हीही पाहा.

५. **चेक**—

जे म्हैसुरांत, बंगळूरच्या सिव्हिल व मिलिटरी स्टेशनांत, हैदराबाद असैन्ड डिस्ट्रिक्टांत, हैदराबाद रेसिडेन्सी बाजारांत अगर सिकंदराबादच्या क्यांटोन्मेंटांत लिहिलेले असून ज्यांबद्दल स्टांप-ड्यूटीचा भर दर तेथें दिलेला असेल ते ब्रिटिश हिंदुस्थानांत बेचन करण्यांत येतील त्या प्रसंगीं.

६. **नकला अगर उतारे.**—

(अ) दक्षिणेंतील शेतकऱ्यांना कर्जबाजारींतून सोडविण्याविषयीं आक्ट ( सन १८७९ चा १७ वा ), याच्या ९८ व्या कलमाअन्वयें गांव रजिस्ट्रारानें पक्षकारांस द्यावयाच्या दस्तऐवजांच्या नकला;

(ब) सरकारी चाप्लेन, पैशाची मदत ज्यांस पोहोंचते अगर ज्यांस पोहोंचत नाहीं असे पाद्री, अगर डायोसेसन रजिस्ट्रार यांच्या दाखल्याच्या, बाप्तिस्म्यांसंबंधी, विवाहसंबंधी अगर दफनसंबंधी रजिस्टरांच्या ज्या नकला अगर उतारे—

(१) सोजर, सेलर अगर बिनसनदी [ नान्-कमिशन्ड ] अगर किरकोळ [ पेटि ] अमलदार यांस, किंवा

(२) जाहिरनामा नं०. १०३, तारीख २० माहे जून सन १८८९ ह्यांत, तारीख २७ मिनहूचें इंडिया गॅझेट, भाग १, पृष्ठ ३४६, यावर प्रसिद्ध केलेल्या कानूंच्या ३ ऱ्या भागांतील ४ थ्या कानूवरून चाप्लेनांस दिलेला मुखत्यारीचा अधिकार ज्या दैन्यदर्शेतील मनुष्यांच्या तर्फे ते चालवितील त्यांस,

देण्यांत येतील त्या नकला अगर उतारे;

[ टीप.—याप्रमाणें दिलेली माफी, ती दिली नसती तर अशा नकला अगर उतारे यांजवर जी कोणतीहि स्टांप ड्यूटी पडती तिच्या संबंधानें दिली आहे असें समजावें.]

(क) खालीं लिहिलेल्या प्रकारच्या नोंदींच्या नकला एखाद्या सोजरानें, सेलरानें, बिनसनदी किंवा किरकोळ अमलदारानें मागितल्या असतील तेव्हां—

(१) जन्म, मृत्यु व लग्नें नोंदण्याबाबद आक्ट ( सन १८८६ चा ६ वा ) ह्याच्या ८ व्या कलमाअन्वयें रजिस्टरांच्या दाखले-नकलांतील नोंदींच्या दिलेल्या नकला;

(२) सदर्हू आक्टाच्या २९ व्या कलमाअन्वयें जन्म व मृत्यु ह्यांच्या कोणत्याही रजिस्ट्रारानें दिलेल्या रजिस्टर बुकांतल्या नोंदींच्या नकला, किंवा

(३) सदर्हू आक्टाच्या ३९ व्या कलमाअन्वयें दिलेल्या रजिस्टरांतील व कागदपत्रांतील नोंदींच्या नकला ;

(ड) मध्यप्रांताचा जमीन महसुलाबाबद आक्ट ( सन १८८१ चा १८ वा ), कलम १४६, याअन्वयें तेथील चीफ कमिशनरानें केलेल्या कोणत्याही कानूवरून जें दफ्तर अगर कागदपत्र तयार करणें अगर

## दुसरें परिशिष्ट—चालू.

### ज्यांस स्टांप-ड्यूटीची माफी आहे ते दस्तऐवज—चालू.

ठेवणें पटवारी लोकांस जरूर आहे त्या दफ्तराच्या अगर कागदपत्रांच्या खऱ्या ह्मणून त्यांनीं दाखला दिलेल्या नकला अगर उतारे,—तीं ज्या गांवासंबंधीं असतील त्या गांवच्या अगर गांवांतील मालगुजरांस अगर कुळांस तीं पटवाऱ्यानें दिलीं असतील त्या प्रसंगीं.

७. डिबेंचर—

(अ) ज्या गहाण खतावरून जाइन्ट स्टाक कंपनीची सगळी किंवा अंशतः मालमिळकत डिबेंचर धारण करणारांच्या हितासाठीं ट्रस्टींच्या स्वाधीन केली जाते त्याच्या शर्तीअन्वयें त्या कंपनीनें काढलेले डिबेंचर बांड आणि त्या डिबेंचरांस जोडलेलीं व्याजाचीं कूपनें;

(ब) म्हैसूर सरकारानें बंगळूरपासून तिपतूरपर्यंत रेलवेची सडक बांधण्याकरितां २०,००,००० रुपयांची रकम ज्या डिबेंचर बांडांच्या द्वारें कर्जी काढली आहे ते डिबेंचर बांड ब्रिटिश हिंदुस्थानांत बेचन करण्यांत येतील त्या प्रसंगीं,

(क) हिंदुस्थान सरकारच्या फिनान्स डिपार्टमेंटांतल्या खालील जाहिरनाम्यांमध्यें निर्दिष्ट केलेले डिबेंचर, ह्मणजे—

| | | | |
|---|---|---|---|
| नंबर | २८९७,* | तारीख | ७ माहे जून सन १८९४. |
| ,, | ३९६९,† | ,, | ७ माहे आगस्ट सन १८९४. |
| ,, | ९७९९,‡ | ,, | २३ माहे नव्हेंबर सन १८९४. |
| ,, | ९९११,§ | ,, | ३० ,, ,, ,, ,, |
| ,, | ६२९८,‖ | ,, | २७ माहे डिसेंबर सन १८९४. |
| ,, | ३३१२, | ,, | ११ माहे जुलै सन १८९५. |
| ,, | ३९८०, | ,, | २६ ,, ,, ,, ,, |
| ,, | ४९३०, | ,, | १७ माहे आक्टोबर सन १८९५. |
| ,, | ९१९७,¶ | ,, | १ माहे नव्हेंबर सन १८९५. |

[ टीप.—याप्रमाणें दिलेली माफी, ती दिली नसती तर असे डिबेंचर काढण्याबद्दल, नवीन करण्याबद्दल, एकाऐवजीं अनेक करण्याबद्दल अगर अनेकांऐवजीं एक सबंध करण्याबद्दल त्यांवर जी कोणतीहि स्टांपड्यूटी पडती तिच्या संबंधानें दिली आहे असें समजावें.]

८. दस्तऐवज—

(अ) शेतकरी लोकांचा कर्ज आक्ट ( सन १८८४ चा १२ वा ) ह्याअन्वयें, किंवा ब्रह्मदेशाचा जमीन व महसूल यांबाबद आक्ट (सन १८७६ चा २ रा) याअन्वयें केलेल्या कानूपैकीं कानू १४७ हिच्याअन्वयें दिलेल्या अगर द्यावयाच्या कर्जाच्या फेडीबद्दल करून दिलेले दस्तऐवज;

(ब) कमिसरेटच्या एक्झिक्युटिव्ह अमलदारांला मक्तेदार जे यादीच्या [ मेमोराण्डमच्या ] अगर कबुलायतीच्या स्वरूपाचे दस्तऐवज देतील अगर त्या अमलदारांशीं करितील ते दस्तऐवज ;

(क) मक्तेदार आपले करार योग्य रीतीनें पुरे करण्याबद्दल यादीच्या [ मेमोराण्डमच्या ] अगर कबुलायतीच्या स्वरूपाचे जे दस्तऐवज आर्डनन्स खातें, आर्मी क्लोदिंग खातें, फारेस्ट खातें अगर पब्लिक वर्क्स खातें यांला देतील अगर त्या खात्यांशीं करितील ते दस्तऐवज;

*तारीख २१ माहे जून सन १८९४ चें मुंबई सरकारी गॅझेट, भाग १, पृष्ठ ६०३ ते ६१७, यांवर पुनः प्रसिद्ध केला आहे.

†तारीख ३० माहे आगस्ट सन १८९४ चें मुंबई सरकारी गॅझेट, भाग १, पृष्ठ ८७८ यावर पुनः प्रसिद्ध केला आहे.

‡तारीख २९ माहे नवेंबर सन १८९४ चें मुंबई सरकारी गॅझेट, भाग १, पृष्ठ ११९७ यावर पुनः प्रसिद्ध केला आहे.

§तारीख ६ माहे डिसेंबर सन १८९४ चें मुंबई सरकारी गॅझेट, भाग १, पृष्ठें १२१९ व १२२० यांवर पुनः प्रसिद्ध केला आहे.

‖तारीख १० माहे जानेवारी सन १८९५ चें मुंबई सरकारी गॅझेट, भाग १, पृष्ठ ३६ यावर पुनः प्रसिद्ध केला आहे.

¶तारीख १४ माहे नव्हेंबर सन १८९५ चें मुंबई सरकारी गॅझेट, भाग १, पृष्ठ ११३३ यावर पुनः प्रसिद्ध केला आहे.

## दुसरें परिशिष्ट—चालू.

### ज्यांस स्टांप-ड्यूटीची माफी आहे ते दस्तऐवज—चालू.

(ड) सरकारी अमलदारांकडे त्यांच्या हुद्याच्या संबंधानें येणाऱ्या मालमत्तेचा योग्य मोसबा देण्याच्या बंदोबस्तासाठीं अशा अमलदारांनीं अगर त्यांच्या जामिनांनीं करून दिले असतील ते दस्तऐवज;

(इ) ज्या दस्तऐवजांवरून मध्यप्रांतांत मालक व इतर असामी, पटवारी लोक ठेवण्याबद्दल व त्यांना मेहनताना देण्याबद्दल सरकाराशीं करार करतात ते दस्तऐवज;

(फ) " सट्टे " या नांवाच्या दस्तऐवजांत सांगितलेल्या हक्कांचे शेरा लिहून केलेले कन्व्हेयन्स ( ही रकम फक्त मध्यप्रांतांत मात्र लागू आहे );

(ग) मद्रास इलाख्यांत सरकाराच्या एखाद्या अमलदारानें अगर सरकारी महसूल भोगत असणाऱ्या कोणत्याही असामीनें रयतवारी ठरावांअन्वयें जमीन धारण करणारांस दिलेले पट्टे;

(ह) जहागिरींच्या सनदा, आणि सरकारानें ज्या जमिनी व्यक्तींस पैशाच्या ऐवजीं दिलेल्या नसून इतर कोणत्या तरी कारणास्तव दिलेल्या असतील त्या जमिनी स्वाधीन करण्याबाबदचे दुसरे दस्तऐवज;

(आय्) सरकारानें जेव्हां खाजगी इसमांकडून सार्वजनिक कारणांकारितां जमीन घेऊन त्यांस तिच्याबदला दुसरी जमीन दिली असेल तेव्हां अशा अदलाबदलीबाबद अशा खाजगी इसमांनीं करून दिलेले दस्तऐवज;

[टीप.—याप्रमाणें दिलेली माफी, ती दिली नसती तर खाजगी इसमांस जी स्टांप-ड्यूटी, हिंदुस्थानचा स्टांप आक्ट ( सन १८७९ चा १ ला), कलम १९, रकम ( फ ) अन्वयें द्यावी लागती तिच्या संबंधानें दिली आहे असें समजावें.]

(ज) आसाममध्यें, पब्लिक वर्क्स खात्यांत चीफ कमिशनराच्या ताब्याखालीं, किंवा स्थानिक बाबींविषयीं आसामसंबंधीं कायदा ( सन १८७९चा ३ रा) याअन्वयें स्थापलेल्या डिस्ट्रिक्ट कमिटींच्या ताब्याखालीं नौकरी करण्याकरितां, मजुरी व देशनिर्गमन यांविषयीं आसामसंबंधी आक्ट ( सन १८८२ चा १ ला ) याच्या ठरावांबरहुकुम केलेले करार ;

(के) मुसलमानांच्या दर्म्यान झालेल्या लग्नाच्या प्रसंगीं करून दिलेलें मेहरचें खत;

(ल) गाहाणाच्या साधारण व्यवहाराबाबद दस्तऐवज, अशा व्यवहारांत जंगम मिळकत गहाण ठेवून पैसा कर्जी काढिला असून असा कर्जी काढिलेला पैसा वीस रुपयांपेक्षा जास्त नसेल तेव्हां.

९. लीस [पट्टे] व उलट-लेख—

(अ) मुंबई इलाख्यांतील अहमदनगर जिल्ह्यापैकीं अकोला तालुक्यांतल्या खालीं लिहिलेल्या गांवांपैकीं कोणत्याही गांवांतल्या संरक्षण केलेल्या जंगलांतील जमिनीबाबद, हिंदुस्थानचा जंगलाचा आक्ट ( सन १८७८ चा ७ वा ) याच्या ३१ व्या कलमाप्रमाणें केलेल्या कानूंअन्वयें सरकारानें दिलेले अगर तसे दिले आहेत असे दिसणारे लीसः सदहू गांव येणेंप्रमाणें:—

| | | |
|---|---|---|
| आंबित. | लव्हाळी कोतुळ. | सामरद. |
| घाटघर. | पाचनई. | शिंगणवाडी. |
| कुमशेत. | पांजरें. | उडदावणें. |

(ब) मुंबईचा जमीनमहसुलाचा कायदा ( सन १८७९ चा मुंबईचा आक्ट ५ वा ) याअन्वयें मुंबई सरकारानें प्रसिद्ध केलेल्या कानूंपैकीं ३१ व्या कानूअन्वयें दिलेले लीस;

(क) उत्तर ब्रह्मदेशासंबंधाचा जमिनीबाबद व महसुलाबाबद कायदा (सन १८८९ चा ३ रा), कलम ३२, ह्याअन्वयें मासळी मारण्याच्या जागांचे दिलेले लीस;

(ड) जमिनीचे विद्यमान खातेदार, मग ते जमीनदार असोत अगर कुळें असोत, आणि स्वतः लागवड करणारे असोत किंवा नसोत, त्यांबरोबर खुद्द सरकारानें केलेल्या ठरावांच्या [सेटलमेंटांच्या] वेळीं

## दुसरें परिशिष्ट—चालू.

### ज्यांस स्टांप-ड्यूटीची माफी आहे ते दस्तऐवज—चालू.

करून दिलेले लीस अगर त्यांचे उलट-लेख: मात्र अशा कोणत्याही विवक्षित लीसाबद्दल फैन किंवा प्रिमियम दिलेला नसावा.

१०. पत्रें—

(अ) ज्या कोणत्याहि मनुष्यास, एकाद्या हुद्याचें काम योग्य रीतीनें करण्याबद्दल किंवा एकादा करार पुरा करण्याबद्दल किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणाबद्दल सरकारास किंवा कोणत्याही स्थानिक अधिकाऱ्यास तारण ह्मणून एकाद्या जिल्हा सेव्हिंग ब्यांकेंत किंवा पोस्ट आफीस सेव्हिंग ब्यांकेंत पैका ठेवावयाचा असेल त्यानें, याप्रमाणें ठेविलेल्या पैक्याचा विनियोग करण्यासंबंधी व तो परत घेण्यासंबंधी अणि त्याचें व्याज देणें होईल तें अदा होण्यासंबंधीं विशेष शर्ती कबूल करून जें पत्र जिल्हा सेव्हिंग ब्यांकेच्या सेक्रेटरीस किंवा पोस्ट आफीस सेव्हिंग ब्यांक स्वाधीन असणाऱ्या पोस्ट मास्तरास अशा सेव्हिंग ब्यांकींच्या कानूंअन्वयें लिहिणें अवश्य आहे तें:

या रकमेंत 'स्थानिक अधिकारी' या संज्ञेचा अर्थ, म्युनिसिपल कमिटी, जिल्हा बोर्ड, पोर्ट कमिशनरांची मंडळी, किंवा ज्या इतर अधिकाऱ्यास म्युनिसिपल फंडावर किंवा लोकल फंडावर निर्बंध ठेवण्याविषयीं किंवा त्या फंडाची व्यवस्था ठेवण्याविषयीं कायदेशीर हक्क असेल किंवा ज्याकडे सदरहू निर्बंध अगर व्यवस्था सरकारानें सोंपली असेल तो इतर अधिकारी, असा समजावा;

(ब) एकाद्या सरकारी सिक्युरिटीच्या सामायिक धारण करणारांपैकीं एकास अगर अनेकांस त्यांपैकीं इतराच्या किंवा इतरांच्या वतीनें अगर अशा इतर सामायिक धारण करणारांपैकीं कोणत्याही एकाच्या अगर अनेकांच्या वतीनें, त्या सिक्युरिटीवरच्या अगर त्या सिक्युरिटीच्याबद्दल दिलेल्या नवीन सिक्युरिटीवरच्या देणें झालेल्या व्याजाबद्दल फारखत देण्याचा अधिकार देण्यासाठीं मात्र दिलेलें अधिकारपत्र अगर मुखत्यारनामा.

११. मेमोऱ्यांडम व आर्टिकल्स आफ् असोसिएशन—

हिंदुस्थानचा कंपन्यांविषयीं आक्ट (सन १८८२ चा ६ वा), कलम २६, ह्याअन्वयें रजिस्टर केलेल्या कोणत्याही असोसिएशनाचें मेमोऱ्यांडम व आर्टिकल्स आफ् असोसिएशन.

१२. विम्याची पालिसी—

(अ). पोस्ट खात्याकडील जिवाचा विमा व माही नेमणुका यांबाबदच्या हिंदुस्थान सरकारच्या अधिकारानें केलेल्या कानूंबरहुकुम हिंदुस्थानच्या पोस्ट खात्याचे डिरेक्टर जनरल यांनीं दिलेल्या जिवाच्या विम्याच्या पालिसी व त्यांनीं करून दिलेले माही नेमणुकांबाबद करार.

(ब) फक्त एकेरी प्रवासाकरितां चालणारी रेलवेवरील अपायांबाबदची विम्याची पालिसी, कोणत्याही रेलवेवरून दर्म्यानच्या किंवा तिसऱ्या वर्गानें प्रवास करणाऱ्या उतारूस दिली असेल तेव्हां.

१३. मुखत्यारनामे—

(अ) दक्षिणेंतील शेतकऱ्यांना कर्जबाजारींतून सोडविण्याविषयीं आक्ट (सन १८७९ चा १७ वा) याच्या ६८ व्या कलमाअन्वयें नातलग, चाकर अगर आश्रित यांस दिलेले मुखत्यारनामे;

(ब) अफिणीची लागवड करणारे जे लोक तगाई घेण्यासाठीं अगर अफिणीच्या लागवडीचा करार करण्यासाठीं जातीनें हजर असत नाहींत त्यांनीं लंबरदारांच्या अगर खातेदारांच्या नांवानें करून दिलेले मुखत्यारनामे.

वरील रकम १० हीही पाहा.

१४. पावत्या—

(अ) मौन्टेड पोलीस कान्स्टेबलांनीं [पोलीस स्वारांतील कान्स्टेबलांनीं] आपल्या पगाराबद्दल व नेमणुकांबद्दल दिलेल्या पावत्या;

## दुसरें परिशिष्ट—समाप्त.

### ज्यांस स्टांप-ड्यूटीची माफी आहे ते दस्तऐवज—समाप्त.

(ब) तारायंत्रद्वारें पाठविलेल्या बातमीच्या जबाबाकरितां भरून ठेविलेल्या, वीस रुपयांपेक्षां अधिक असणाऱ्या रकमांबद्दल, बातमी ज्याच्या नांवें पाठविली असेल त्यानें दिलेल्या पावत्या;

(क) पोस्टाच्या मनीआर्डरींचा ऐवज घेणारानें त्यांच्या पाठीवर दिलेल्या पावत्या;

[टीप.—याप्रमाणें दिलेली माफी, ती दिली नसती तर अशा पावत्यांवर जी कोणतीहि स्टांप-ड्यूटी पडती तिच्या संबंधानें दिली आहे असें समजावें.]

(ड) रेल्वे कंपन्यांनीं अगर आड्मिनिस्ट्रेशनांनीं उतारू अगर माल किंवा दोन्ही, अगर जनावरें नेण्याबाबदच्या भाड्याबद्दल दिलेल्या, आणि अशा भाड्याच्या संबंधानें जास्त घेतलेला पैसा परत मिळाल्याबद्दल अशा कंपन्यांस अगर आड्मिनिस्ट्रेशनांस दिलेल्या पावत्या;

(ई) सरकारी प्रामिसरी नोटींवरील व्याज मिळाल्याबद्दल दिलेल्या पावत्या;

(फ) पोस्ट आफीस, जिल्हा, इलाखा अगर स्टेट रेल्वे, या सेव्हिंग ब्यांकींमध्यें किंवा ईस्ट इंडियन रेल्वे सेव्हिंग ब्यांकीमध्यें पैका ठेवणारांनीं किंवा त्यांच्या वतीनें अशा कोणत्याही ब्यांकींतून परत घेतलेल्या पैक्याच्या रकमांबद्दल दिलेल्या पावत्या;

[टीप.—याप्रमाणें दिलेली माफी, ती दिली नसती तर अशा पावत्या ज्या बाबतींत स्टांप-ड्यूटीस पात्र होत्या त्या सर्व बाबतींत लागू आहे असें समजावें.]

(ग) अफिणीची लागवड करणारे अगर त्यांचे वारचे यांस आणि बहार व बनारस एजन्सींमध्यें लंबरदार व खातेदार यांस अफिणीच्या लागवडीकरितां तगाई ह्मणून सरकारानें दिलेल्या पैक्याबद्दल त्यांनीं दिलेल्या पावत्या.

१९. शेर-वारंटें—

हिंदुस्थानचा कंपन्यांविषयीं आक्ट (सन १८८२ चा ६ वा), कलम ३०, ह्याअन्वयें कोणत्याही कंपनीनें काढिलेलीं शेर-वारंटें:

ही माफी, हिंदुस्थानचा कंपन्यांविषयीं आक्ट (सन १८८२ चा ६ वा), कलम ३१, यांत सांगितलेल्या ड्यूटीच्या संबंधानें असून ती, त्या ड्यूटीच्याऐवजीं खालील उक्ती रकम कलेक्टर आफ् स्टांप रेव्हेन्यू ह्यांकडे भरल्यावर मात्र अमलांत येईल. ती उक्ती रकम येणेंप्रमाणें:—

(अ) कंपनीच्या आंकडा भरलेल्या सगळ्या भांडवलावर दरशेंकडा बारा आणे, किंवा

(ब) ज्या कंपनीनें सदहू ड्यूटी किंवा उक्ती रकम पुरी भरलेली असेल, तिनें जर तदनंतर आपलें आंकडा भरलेलें भांडवल जास्त शेर-वारंटें काढून वाढविलें, तर याप्रमाणें वाढविलेल्या भांडवलावर दरशेंकडा बारा आणे.

(सही) जे. एफ्. फिन्ले,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार."

आलीजाह नेक नामदार गव्हर्नरसाहेब बहादूर
इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

जे. मॉण्टीथ,
आक्टिंग सेक्रेटरी निसबत सरकार.

(True Translation.)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS

# मुंबई सरकार.

**मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आलीजाह् गव्हर्नरसाहेब यांनीं तारीख १७ माहे अक्टोबर सन १८९५ रोजीं, आणि आली जनाब व्हाइसरॉय व गव्हर्नर जनरल यांनीं तारीख ६ माहे जानेवारी सन १८९६ रोजीं मंजूर केला तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला असे :—**

## सन १८९६ चा मुंबईचा आक्ट १ ला.

**सन १८६९ चा मुंबईचे सिविल कोर्टांचा आक्ट सुधारण्याबाबद आक्ट.**

( या आक्टास हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांनीं दिलेली मंजुरी मुंबईचे गव्हर्नर यांनीं तारीख २४ माहे जानेवारी सन १८९६ रोजीं प्रसिद्ध केली. )

ज्याअर्थीं सन १८७६ च्या व सन १८८० च्या मुंबई रेव्हेन्यु हुकुमतीच्या आक्टांवरून आणि सन १८९१ चा कायदे रद्द करण्याबाबद व सुधारण्याबाबद आक्ट यावरून सुधारलेला सन १८६९ चा मुंबईचे सिविल कोर्टांचा आक्ट याचें २२ वें व ३२ वें कलम सुधारणें योग्य आहे, आणि ज्याअर्थीं सन १८९२ चा हिंदुस्तानचा कौन्सिलांबाबद आक्ट याच्या ५ व्या कलमावरून जरूर असल्याप्रमाणें आली जनाब गव्हर्नर जनरल यांची हा आक्ट पास करण्यासाठीं पूर्वी मंजूरी मिळविलेली आहे, त्याअर्थीं खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविलें आहे :—

१. या आक्टास "सन १८९६ चा मुंबईचे सिविल कोर्टांचा आक्ट सुधारण्याबाबद आक्ट" असें ह्मणावें. — लहान सरनामा.

२. वर सांगितल्याप्रमाणें सुधारलेला सन १८६९ चा मुंबईचे सिविल कोर्टांचा आक्ट, याच्या २२व्या कलमाच्या दुसऱ्या पारिग्राफांत "कोणी मनुष्य राणी सरकारचा रैयत असून त्याणें" या शब्दांच्या ऐवजीं खालीं लिहिलेला मजकूर दाखल करावा, ह्मणजे : — कलम २२ याची सुधारणूक.

"जो कोणी मनुष्य मलिका मोअज्जमांचा रैयत किंवा मलिका मोअज्जमांच्या सार्वभौमसत्तेखालीं असणाऱ्या हिंदुस्तानांतील देशी राजाचा अथवा संस्थानाचा रैयत नसेल व शिवाय ज्याणें".

३. वर सांगितल्याप्रमाणें सुधारलेल्या सदर्हू आक्टाच्या ३२ व्या कलमाच्या विशेष ठरावाच्या (ब) रकमेऐवजीं खालीं लिहिलेला मजकूर दाखल करावा, ह्मणजेः— कलम ३२ याची सुधारणूक.

"(ब) (१) कोर्टाच्या ज्या अमलदारास दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयींच्या कायद्याचें कलम ४९६ याच्या शेवटच्या पारिग्राफाअन्वयें नेमलें असेल तो अमलदार,

(२) ज्या सरकारी अमलदारास, सन १८४१ च्या १९ व्या आक्टाच्या ९ व्या कलमाअन्वयें मिळकतीचें संरक्षण करण्यास नेमलें असेल किंवा सन १८९८ च्या ३९ व्या आक्टाच्या ९ व्या कलमाअन्वयें एकाद्या वेड्या [मनुष्या]च्या मालमिळकतीचा व्यवस्थापक नेमलें असेल किंवा सन १८९० चा पालनकरणारे व वार्ड यांबाबद आक्ट याअन्वयें कोर्टानें, त्याच्या हुद्याच्या नात्यानें, एकाद्या अल्पवयी मनुष्याच्या शरीराचा किंवा मिळकतीचा, अगर त्या दोहींचा, पालनकरणारा ह्मणून नेमलें असेल किंवा ठरविलें असेल तो अमलदार,

अशा नेमणुकीच्या किंवा ठरावाच्या सबबेनें सदहू प्रकारच्या दाव्याचा पक्षकार आहे या कारणानें."

आलीजाह नेक नामदार गव्हर्नरसाहेब बहादूर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

एम्. एच्. डब्ल्यू. हेवर्ड,
मुंबईचे गव्हर्नर यांच्या कायदेकानू करणाऱ्या कौन्सिलाचे सेक्रेटरी.

(True Translation.)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.